यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत

ज्ञानगंगा घरोघरी

Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : dir_shu@ycmou.digitaluniversity.ac दूरध्वनी Telephone : (0253) 2231475

मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा / School of Humanities & Social Sciences

दिनांक : २१/११/२०२५

# उद्बोधन वर्ग अहवाल

## शैक्षणिक वर्ष २०२५-२६, एम. ए पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम (इतिहास M60)

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (DEB) मार्गदर्शक सूचनांनुसार पदव्युत्तर पदवी एम.ए. इतिहास (M60) या शिक्षणक्रमाला प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी उद्बोधन वर्ग दि. १० ऑक्टोबर २०२५ रोजी मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेमध्ये ऑनलाईन माध्यमातून आयोजित करण्यात आला.

या प्रसंगी शिक्षणक्रम संयोजक डॉ. संजय खरात यांनी प्रास्ताविक करून उद्बोधन वर्ग आयोजित करण्यामागील भूमिका विशद केली. या उद्बोधन वर्गासाठी मार्गदर्शक म्हणून विद्याशाखेचे संचालक प्रा. नागार्जुन वाडेकर उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना दूरस्थ शिक्षणप्रणाली विषयी माहिती देऊन, विद्यापीठाची पार्श्वभूमी, उद्दिष्टे आणि विद्यापीठाची कार्यपद्धती याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.


सकाळच्या सत्रात (सकाळी ११:३० ते ०१:००) PPT च्या माध्यमातून प्रथम सत्रातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुरू करण्यात आलेल्या एम.ए. इतिहास (M60) या शिक्षणक्रमाची ओळख करून देण्यात आली. यामध्ये शिक्षणक्रमाची उद्दिष्टे, निष्पत्ती, शिक्षणक्रम व अभ्यासक्रम संरचना, श्रेयांक पद्धती, मूल्यमापन संरचना, मूल्यांकन पद्धती, स्वयं-अध्ययन साहित्य, समंत्रण सत्रे, गृहपाठ पद्धती, विद्यार्थी कल्याणाच्या विविध योजना, महत्त्वाची संकेतस्थळे आणि नोकरीच्या भविष्यातील संधी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. दुपारच्या सत्रात (दुपारी २:३० ते ४:००) PPT च्या माध्यमातून तृतीय सत्रातील विद्यार्थ्यांना संशोधन पद्धती, क्षेत्रीय प्रकल्प तसेच संशोधन प्रकल्प याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये क्षेत्रीय किंवा संशोधन प्रकल्पाचा विषय कसा निवडावा, स्थानिक/प्रादेशिक विषयांचा त्यासाठी कसा उपयोग करावा, तसेच प्रकल्प स्वहस्ताक्षरात कसा लिहावा याचे विस्तृत विवेचन करण्यात आले.


दोन्ही सत्रांच्या शेवटी प्रश्नोत्तरे घेण्यात आली व विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. या उद्बोधन सत्रामध्ये एम.ए. इतिहास शिक्षणक्रमाला प्रवेशित विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. शेवटी उपस्थित विद्यार्थ्यांचे आभार मानून मा. संचालक यांच्या संमतीने उद्बोधन वर्गाचा समारोप करण्यात आला. हा उद्बोधन वर्ग यशस्वी होण्यासाठी श्री. गुलाब घाटाळ (तांत्रिक सहाय्यक) तसेच इतर प्रशासकीय सहाय्यक यांनी मोलाचे सहकार्य केले.

**सोबत** : ऑनलाईन झूम लिंक व फोटो -
Zoom Link - https://shorturl.at/NIPjN

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
ज्ञानगंगा घरोघरी
य.च.म.मु.वि., नाशिक






मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
ज्ञानगंगा घरोघरी
य.च.म.मु.वि., नाशिक

**प्रा. नागार्जुन वाडेकर**
संचालक
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा